ePaper
"मोदीजी, प्रधानांचा राजीनामा घ्या नाहीतर पंतप्रधानांच्या राजीनाम्याची वेळ येईल"

वर्ष - 9 | UDYAM-MH-26-0158827

# महाईन्यूज™

WWW.MAHAENEWS.COM | शुक्रवार, दि. 24 जुलै 2026 | पुणे, पिंपरी-चिंचवड आवृत्ती | MAHAENEWS.COM | लढाई सत्याची... लोकशाहीच्या हक्काची!





पान 3 वरुन...
१७५ कोटींच्या निधीने उन्नत कॉरिडॉरला 'ग्रीन सिग्नल'

## दिल्ली उच्च न्यायालयात याचिका, आज तातडीची सुनावणी

# CJP मोर्चा विदेशी षडयंत्र?

**महाईन्यूज । कोलकाता**

**NEET पेपरफुटी प्रकरणाच्या निषेधार्थ २० जुलै रोजी दिल्लीत झालेल्या CJP (कॉक्रोच जनता पार्टी)च्या मोर्चाविरोधात दिल्ली उच्च न्यायालयात याचिका दाखल करण्यात आली आहे. या याचिकेवर २४ जुलै रोजी तातडीने सुनावणी घेण्यास न्यायालयाने परवानगी दिली आहे.**



याचिकाकर्ते सतीष कुमार अगरवाल (अखिल भारत हिंदू महासभेचे माजी उपाध्यक्ष) यांनी मोर्चा हा मोठ्या कटाचा भाग असल्याचा आरोप केला असून या संपूर्ण प्रकरणाची चौकशी राष्ट्रीय तपास संस्था (NIA) कडे सोपवण्याची मागणी केली आहे.

याचिकेनुसार, २० जुलैचा मोर्चा हा विदेशी आर्थिक पाठबळ व काही राजकीय शक्तींच्या हस्तक्षेपातून आयोजित करण्यात आल्याचा संशय व्यक्त करण्यात आला आहे. मोर्चादरम्यान दिल्लीतील जनजीवन विस्कळीत झाले, रस्ते बंद करण्यात आले, हिंसाचार, सार्वजनिक व खासगी मालमत्तेचे नुकसान, पत्रकारांवर हल्ले, पोलिसांवर दगडफेक तसेच संसद भवनाच्या सुरक्षेला धोका निर्माण झाल्याचा आरोपही करण्यात आला आहे.



याचिकेत पुढे म्हटले आहे की, NEET पेपरफुटीच्या निषेधासाठी सुरू झालेले आंदोलन नंतर राजकीय स्वरूपाचे झाले. तसेच सामाजिक कार्यकर्ते सोनम वांगचुक यांच्या काही विदेशी संस्थांशी असलेल्या कथित संबंधांचीही चौकशी करण्याची मागणी करण्यात आली आहे. काही विदेशी घटक आणि देशविघातक शक्तींनी आर्थिक मदतीद्वारे देशात अस्थिरता निर्माण करण्याचा कट रचल्याचा आरोपही याचिकेत करण्यात आला आहे. याशिवाय, आंदोलनात काही राजकीय नेत्यांचा सहभाग, तसेच लेखिका अरुंधती रॉय यांच्या उपस्थितीचाही उल्लेख करत आंदोलनाच्या उद्देशावर प्रश्नचिन्ह उपस्थित करण्यात आले आहे.

दरम्यान, या सर्व आरोपांबाबत संबंधित पक्षांची भूमिका अद्याप न्यायालयासमोर मांडली गेलेली नाही. या याचिकेवरील सुनावणीनंतर पुढील कायदेशीर दिशा स्पष्ट होणार आहे.

### न्यायालयीन प्रक्रियेकडे लक्ष

CJPच्या २० जुलैच्या मोर्चाविरोधात दाखल याचिकेवर दिल्ली उच्च न्यायालयात २४ जुलै रोजी सुनावणी होणार आहे. मोर्चादरम्यान हिंसाचार, जनजीवन विस्कळीत होणे, मालमत्तेचे नुकसान आणि विदेशी हस्तक्षेपाचे आरोप याचिकेत करण्यात आले असून, या दाव्यांची चौकशी करण्याची मागणी करण्यात आली आहे.

### CJP विरोधातील याचिकेत नेमके कोणते आरोप?

दिल्ली उच्च न्यायालयात सीजेपीविरोधात दाखल करण्यात आलेल्या याचिकेमध्ये २० जुलैच्या मोर्चावर अनेक गंभीर आरोप करण्यात आले आहेत. तसेच, या सर्व आरोपांची सखोल चौकशी करण्यासाठी हे प्रकरण तपासासाठी NIA अर्थात राष्ट्रीय तपास संस्थेकडे सोपवण्यात यावं, अशी मागणीदेखील याचिकेत करण्यात आली आहे. सदर याचिका अखिल भारत हिंदू महासभेचे माजी उपाध्यक्ष सतीष कुमार अगरवाल यांनी दाखल केली आहे.

# पुरंदर विमानतळाला मोठा वेग!

## डिसेंबरपर्यंत निविदा प्रक्रिया पूर्ण करण्याचे आदेश; एसपीव्हीला डीपीआर तयार करण्याचे निर्देश

**महाईन्यूज । पुणे**

**पुरंदर येथील प्रस्तावित छत्रपती संभाजीराजे आंतरराष्ट्रीय विमानतळ प्रकल्पाच्या उभारणीला आता गती मिळणार असून, भूसंपादनासाठी शेतकऱ्यांची संमती अंतिम टप्प्यात पोहोचल्यानंतर राज्य सरकारने 'स्पेशल पर्पज व्हेईकल' (एसपीव्ही) ला सविस्तर प्रकल्प अहवाल (डीपीआर) तयार करण्याचे आदेश दिले आहेत. तसेच डिसेंबरपर्यंत विमानतळाच्या उभारणीसाठी आवश्यक निविदा प्रक्रिया पूर्ण करण्याच्या सूचनाही देण्यात आल्या आहेत.**



पुरंदर तालुक्यातील सात गावांमध्ये सुमारे तीन हजार एकर क्षेत्रावर हा आंतरराष्ट्रीय विमानतळ उभारण्यात येणार आहे. त्यासाठी १,२१६ हेक्टर जमिनीचे भूसंपादन करण्यात येत असून, आतापर्यंत ९१ टक्के क्षेत्रासाठी शेतकऱ्यांनी संमती दर्शविली आहे. त्यामुळे भूसंपादन प्रक्रिया अंतिम टप्प्यात पोहोचली असून, पुढील प्रशासकीय हालचालींना वेग आला आहे.

या प्रकल्पासाठी सुमारे सहा हजार कोटी रुपयांचा निधी लागणार असून, तो 'हुडको' या वित्तीय संस्थेमार्फत उपलब्ध करून देण्यात आला आहे. प्रकल्पाच्या अंमलबजावणीसाठी स्थापन करण्यात आलेल्या एसपीव्हीमध्ये सिडकोचा ५१ टक्के, महाराष्ट्र विमानतळ विकास कंपनी (एमएडीसी)चा १९ टक्के, तर पीएमआरडीए आणि एमआयडीसीचा प्रत्येकी १५ टक्के सहभाग आहे.

राज्याचे मुख्य सचिव राजेश अगरवाल यांच्या अध्यक्षतेखाली मंत्रालयात झालेल्या बैठकीत प्रकल्पाच्या प्रगतीचा आढावा घेण्यात आला. बैठकीस सिडको, वित्त, वाहतूक, नगरविकास विभागाचे वरिष्ठ अधिकारी, एमआयडीसीचे अधिकारी तसेच पुण्याचे जिल्हाधिकारी जितेंद्र डुडी उपस्थित होते. या बैठकीत डीपीआर तातडीने तयार करण्याबरोबरच निविदा प्रक्रिया सुरू करण्याचे निर्देश देण्यात आले.

जिल्हाधिकारी जितेंद्र डुडी यांनी सांगितले की, सरकारचा डिसेंबरपर्यंत प्रत्यक्ष काम सुरू करण्याचा मानस असून, डीपीआर, निविदा प्रक्रिया आणि भूसंपादन यासाठी जिल्हा प्रशासनाकडून आवश्यक ते सर्व सहकार्य करण्यात येणार आहे.

प्रस्तावित विमानतळासाठी पुरंदर तालुक्यातील सात गावांतील सुमारे १,२१६ हेक्टर जमीन संपादित केली जात आहे. राज्यातील महत्त्वाकांक्षी पायाभूत प्रकल्पांपैकी एक असलेल्या या विमानतळामुळे पुणे जिल्ह्याच्या औद्योगिक, व्यावसायिक आणि आर्थिक विकासाला मोठी चालना मिळण्याची अपेक्षा आहे. तसेच, गुंतवणूक आणि रोजगाराच्या नव्या संधी निर्माण होणार आहेत.

### संमतिपत्रासाठी मुदतवाढ

पुरंदर तालुक्यातील प्रस्तावित छत्रपती संभाजीराजे आंतरराष्ट्रीय विमानतळाच्या भूसंपादन प्रक्रियेला गती देण्यासाठी जिल्हा प्रशासनाने शेतकऱ्यांकडून संमतिपत्र स्वीकारण्याची मुदत ३१ जुलैपर्यंत वाढवली आहे. अधिकाधिक जमीनधारकांनी स्वेच्छेने प्रक्रियेत सहभागी व्हावे आणि उर्वरित भूसंपादन वेळेत पूर्ण व्हावे, या उद्देशाने हा निर्णय घेण्यात आला आहे. प्रशासनाच्या माहितीनुसार, विमानतळासाठी आवश्यक असलेल्या जमिनीपैकी मोठ्या प्रमाणात भूसंपादनाची प्रक्रिया पूर्ण झाली असून, अनेक शेतकऱ्यांच्या बँक खात्यांमध्ये मोबदल्याची रक्कम जमा करण्यात आली आहे.

# पुणेकरांना मिळणार नियमित पाणीपुरवठा! महापौरांनी केली घोषणा

**महाईन्यूज । पुणे**

**'पुणे शहरातील नागरिकांना नियमित पाणीपुरवठा केला जात असून, सध्या शहरात कोणत्याही प्रकारची पाणीकपात करण्यात आलेली नाही,' अशी माहिती पुणे महानगरपालिकेच्या महापौर मंजूषा नागपुरे यांनी दिली.**




शहराला पाणीपुरवठा करणाऱ्या धरणांमधील पाण्याची स्थिती आणि २२ जुलै रोजी पावसाची स्थिती लक्षात घेऊन पाणीकपात पुन्हा सुरू करायची की नाही, याचा निर्णय घेतला जाईल, असे महापौर नागपुरे यांनी गेल्या आठवड्यात सांगितले होते. गेल्या दोन दिवसांपासून शहर आणि धरणक्षेत्र परिसरात पाऊस पडत आहे. त्यामुळे सध्या तरी पुणेकरांना नियमित दिल्या जाणाऱ्या पाण्यात कोणतीही कपात केली जाणार नाही,' असे नागपुरे यांनी सांगितले.

शहराला पाणीपुरवठा करणाऱ्या धरण साखळी परिसरात जोरदार पाऊस सुरू आहे. त्यामुळे धरणातील पाणीसाठा गेल्या २४ तासात दोन टीएमसी ने वाढला आहे. धरणातील उपलब्ध पाणी साठा सध्या २०.५० टीएमसी पर्यंत गेला आहे. त्यामुळे पुणेकरांची वर्षभराची पाण्याची चिंता मिटली आहे. धरणातील पाणीसाठा वाढत असल्याने पाऊस कायम राहिल्यास टप्प्याटप्प्याने धरणातून पाणी सोडण्याचे नियोजन जलसंपदा विभागाने केले आहे.

पुणे शहरासह जिल्ह्यातील विविध भागात गेल्या दोन दिवसांपासून पावसाने हजेरी लावली आहे वरसगाव, पानशेत, टेमघर यासह अन्य धरणातील पाणी पातळी यामुळे वाढत आहे. धरणात पाणलोट क्षेत्रातून पाण्याची आवक सुरू असल्याने खडकवासला धरणातून उजवा कालव्याद्वारे १०५४ क्युसेस विसर्ग सुरू करण्यात आला आहे. जिल्ह्यातील पवना, चासकमान आणि इतर धरणांमध्ये देखील पाणी वाढत आहे.

घाट परिसरासह शहरातही पर्जन्यवृष्टी होत आहे. त्यातही घाट परिसरात अतिवृष्टीसदृश्य स्थिती आहे. शहरात तुरळक पाऊस झाला. बुधवारी सकाळी साडेआठपर्यंत घाट परिसरातील ताम्हिणी येथे २७५, आंबोणा येथे १८५, मुळशी येथे १५१, लोणावळा येथे १४२ मिमी पाऊस झाला.

### पाणीसाठा २० टीएमसीवर


शहराला पाणीपुरवठा करणारा चारही धरणांतील पाणीसाठा बुधवारी २०.१५ अब्ज घनफुटांवर पोहोचला. या पाणीसाठ्यात गेल्या २४ तासांत १.८५ टीएमसीने वाढ झाल्याची माहिती जलसंपदा विभागाकडून देण्यात आली. दरम्यान, 'खडकवासला प्रकल्पात पाण्याची आवक होत असल्यामुळे धरणातून विसर्गही सुरू करण्यात येण्याची शक्यता असून, नागरिकांनी दक्षता बाळगावी,' असे आवाहन राज्याच्या जलसंपदा विभागाकडून करण्यात आले आहे. शहरातील काही ठिकाणी चांगल्या पावसाची नोंद झाली.

# १७५ कोटींच्या निधीने उन्नत कॉरिडॉरला 'ग्रीन सिग्नल'

## आमदार महेश लांडगे यांच्या पाठपुराव्यामुळे पीएमआरडीएच्या भूसंपादनाचा मार्ग मोकळा

**महाईन्यूज** । पिंपरी-चिंचवड

**पिंपरी-चिंचवडमधील नाशिक फाटा ते खेड उन्नत कॉरिडॉर (TWIN ELEVATED CORRIDOR) प्रकल्पासाठी आवश्यक भूसंपादन प्रक्रियेला मोठा दिलासा मिळाला असून, पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरण (PMRDA) हद्दीतील ४.१०४ हेक्टर जमिनीच्या भूसंपादनासाठी १७५ कोटी रुपयांचा निधी उपलब्ध करून देण्याबाबत महाराष्ट्र शासनाच्या सार्वजनिक बांधकाम विभागाने महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळास (MSRDC) पत्र पाठविले आहे. या निर्णयामुळे रखडलेल्या भूसंपादन प्रक्रियेला गती मिळण्याची अपेक्षा व्यक्त होत आहे.**




नाशिक फाटा ते खेड उन्नत कॉरिडॉर प्रकल्पासाठी अतिरिक्त १४.१ हेक्टर भूसंपादन आवश्यक असून, यामध्ये पिंपरी-चिंचवड महानगरपालिका हद्दीतील ३.८६९ हेक्टर, महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळाच्या अखत्यारीतील ६.१२८ हेक्टर आणि पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाच्या हद्दीतील ४.१०४ हेक्टर जमिनीचा समावेश आहे. भारतीय राष्ट्रीय राजमार्ग प्राधिकरणाने (NHAI) या भूसंपादनासाठी एकूण ६०० कोटी रुपयांचे मूल्यांकन केले असून, संबंधित यंत्रणांना प्रत्येकी २०० कोटी रुपयांचा निधी वितरित करण्यास यापूर्वी मान्यता देण्यात आली होती.

महाराष्ट्र शासनाच्या सार्वजनिक बांधकाम विभागाने २० जुलै २०२६ रोजी जारी केलेल्या पत्रानुसार, महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळाकडे भूसंपादनासाठी वितरित करण्यात आलेल्या २०० कोटी रुपयांच्या अखर्चित निधीपैकी १७५ कोटी रुपयांची तरतूद नगरविकास विभागामार्फत पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाला उपलब्ध करून देण्याच्या सूचना केल्या आहेत. त्यामुळे पीएमआरडीएच्या हद्दीतील भूसंपादन प्रक्रियेला गती मिळणार असून, प्रकल्पाच्या अंमलबजावणीतील एक महत्त्वाचा अडथळा दूर होणार आहे.

दरम्यान, भाजपाचे आमदार महेश लांडगे यांनी याबाबत राज्य विधिमंडळाच्या अधिवेशनात लक्षवेधी सूचना उपस्थित करून शासनाचे लक्ष वेधले होते. तसेच, राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे भूसंपादनासाठी आवश्यक निधी उपलब्ध करण्याबाबत पाठपुरावा केला होता. त्यांच्या सातत्यपूर्ण पाठपुराव्यानंतर शासनाने हा निर्णय घेतल्याने प्रकल्पाच्या कामाला वेग येणार आहे. तसेच, पिंपरी-चिंचवड महानगरपालिका हद्दीतील भूसंपादनासाठीही निधी लवकरच मंजूर करण्यात येणार आहे.

> नाशिक फाटा ते खेड उन्नत कॉरिडॉर हा केवळ एक रस्ता प्रकल्प नसून, पिंपरी-चिंचवड आणि पुणे परिसराच्या भविष्यातील वाहतूक व्यवस्थेला नवी दिशा देणारा महत्त्वाकांक्षी प्रकल्प आहे. या प्रकल्पाच्या भूसंपादनासाठी आवश्यक निधी उपलब्ध व्हावा, यासाठी मी राज्य विधिमंडळाच्या अधिवेशनात लक्षवेधी सूचनेद्वारे शासनाचे लक्ष वेधले होते. तसेच, मुख्यमंत्री मा. देवेंद्रजी फडणवीस यांच्याकडे लेखी पत्राद्वारे पाठपुरावा केला होता. त्यानंतर शासनाने पीएमआरडीएच्या भूसंपादनासाठी १७५ कोटी रुपयांचा निधी उपलब्ध करून देण्याचा निर्णय घेतला आहे, ही अत्यंत समाधानाची बाब आहे. पिंपरी-चिंचवड शहराच्या सर्वांगीण विकासासाठी वाहतूक कोंडीमुक्त आणि गतिमान पायाभूत सुविधा निर्माण करणे ही आमची प्राथमिकता आहे. हा प्रकल्प वेळेत पूर्ण व्हावा आणि नागरिकांना त्याचा लाभ लवकरात लवकर मिळावा, यासाठी भविष्यातही शासनस्तरावर सातत्याने पाठपुरावा करणार आहोत.
>
> **- महेश लांडगे, आमदार, भाजपा, पिंपरी-चिंचवड, पुणे.**

नाशिक फाटा ते खेड उन्नत कॉरिडॉर हा पिंपरी-चिंचवड आणि पुणे शहरातील वाहतूक कोंडी सोडविणारा महत्त्वाकांक्षी प्रकल्प मानला जातो. या प्रकल्पामुळे नाशिक फाटा, भोसरी, मोशी, चऱ्होली परिसरासह पुणे-नाशिक महामार्गावरील वाहतुकीला मोठा दिलासा मिळणार असून, औद्योगिक व निवासी भागांतील प्रवास अधिक वेगवान आणि सुलभ होणार आहे. त्यामुळे भूसंपादनासाठी आवश्यक निधीची उपलब्धता हा प्रकल्पाच्या दृष्टीने महत्त्वाचा टप्पा आहे.

### १७५ कोटींची मोठी तरतूद!

उन्नत कॉरिडॉरच्या भूसंपादनासाठी पीएमआरडीए हद्दीतील ४.१०४ हेक्टर जमिनीकरिता १७५ कोटी रुपयांचा निधी उपलब्ध होणार आहे. आमदार महेश लांडगे यांनी विधिमंडळात लक्षवेधी सूचना मांडत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे सातत्याने पाठपुरावा केल्यानंतर शासनाने हा महत्त्वपूर्ण निर्णय घेतला. त्यामुळे रखडलेल्या भूसंपादन प्रक्रियेला गती मिळून नाशिक फाटा–खेड उन्नत कॉरिडॉर प्रकल्पाच्या कामाला वेग येणार आहे.

# 'इन्कलाब जिंदाबाद'च्या घोषणांनी पिंपरी दणाणली; हजारो विद्यार्थ्यांचे आंदोलन

**महाईन्यूज** । पिंपरी-चिंचवड

**नीट पेपरफुटीसह विविध स्पर्धा परीक्षांतील कथित गैरप्रकारांच्या निषेधार्थ आणि दिल्लीतील विद्यार्थी आंदोलनाला पाठिंबा दर्शविण्यासाठी वंचित बहुजन आघाडीच्या वतीने गुरुवारी (दि. २३) पिंपरीत मोठे आंदोलन करण्यात आले. डॉ. बाबासाहेब आंबेडकर चौक (भीम सृष्टी) येथे झालेल्या या आंदोलनात हजारो विद्यार्थी व कार्यकर्ते सहभागी झाले.**




सकाळी पिंपरी परिसरातून रॅली काढण्यात आली. त्यानंतर भीम सृष्टी येथे ठिय्या आंदोलन करण्यात आले. परीक्षा प्रक्रियेत पारदर्शकता आणावी, पेपरफुटी व कथित गैरव्यवहाराची सखोल चौकशी करून दोषींवर कठोर कारवाई करावी, तसेच विद्यार्थ्यांच्या भविष्याशी होणारा अन्याय थांबवावा, अशी मागणी आंदोलनकर्त्यांनी केली.

दिवसभर सुरू असलेल्या पावसाची पर्वा न करता विद्यार्थी आणि कार्यकर्ते आंदोलनस्थळी ठामपणे उभे राहिले. "इन्कलाब जिंदाबाद", "आझादी लेकर रहेंगे" आणि "धर्मेंद्र प्रधान यांचा राजीनामा झालाच पाहिजे" अशा घोषणांनी परिसर दणाणून गेला. विद्यार्थ्यांनी केंद्र सरकारने स्पर्धा परीक्षांतील कथित गैरप्रकारांवर कठोर कारवाई करून विद्यार्थ्यांना न्याय द्यावा, अशी मागणी केली.

आंदोलनाच्या पार्श्वभूमीवर परिसरात कडेकोट पोलिस बंदोबस्त तैनात करण्यात आला होता. विद्यार्थ्यांच्या प्रश्नांकडे सरकारने तातडीने लक्ष देऊन ठोस निर्णय घ्यावेत, अशी मागणी आंदोलनकर्त्यांनी केली.

### घोषणांनी परिसर दणाणला

"इन्कलाब जिंदाबाद", "आझादी लेकर रहेंगे" आणि "धर्मेंद्र प्रधान यांचा राजीनामा झालाच पाहिजे" अशा घोषणांनी भीम सृष्टी परिसर दणाणून गेला. दिल्लीतील विद्यार्थी आंदोलनाला पाठिंबा देण्यासाठी हजारो विद्यार्थी आणि वंचित बहुजन आघाडीचे कार्यकर्ते रस्त्यावर उतरले. परीक्षा प्रक्रियेत पारदर्शकता, दोषींवर कठोर कारवाई आणि विद्यार्थ्यांना न्याय मिळावा, अशी प्रमुख मागणी आंदोलनातून करण्यात आली.



## भूमिका

**देशातील पेपरफुटी प्रकरणामुळे निर्माण झालेला विद्यार्थ्यांचा संताप हा केवळ परीक्षा व्यवस्थेतील त्रुटींविरोधातील आवाज नसून, शासनाच्या कार्यपद्धतीवर उपस्थित झालेला गंभीर प्रश्न आहे. या आंदोलनाला विविध राजकीय पक्षांनी पाठिंबा दिला असला, तरी त्यामागील मूळ कारण म्हणजे लाखो विद्यार्थ्यांच्या भविष्याशी झालेला खेळ हेच आहे.**

# आंदोलनातून समोर आलेले कटू वास्तव



त्यामुळे हा विषय केवळ राजकारणाच्या चौकटीत न पाहता प्रशासनाच्या उत्तरदायित्वाच्या दृष्टीने पाहणे आवश्यक आहे.

पेपरफुटीचे गांभीर्य सरकारने मान्य केले असले, तरी दोषींवर कठोर कारवाई आणि भविष्यात अशा घटना टाळण्यासाठी ठोस उपाययोजना याबाबत जनतेला स्पष्ट आश्वासन अपेक्षित आहे. केवळ राजीनाम्यांच्या मागण्या किंवा परस्परांवरील आरोप-प्रत्यारोप यामुळे समस्येचे निराकरण होत नाही.

लोकशाहीत विरोधी पक्ष आंदोलन करणारच; त्यावर टीका करण्यापेक्षा समस्येच्या मुळाशी जाणे अधिक महत्त्वाचे आहे. या आंदोलनाने आणखी एक वास्तव अधोरेखित केले. विरोधी पक्ष कमकुवत झाले म्हणून जनतेचा विरोध संपतो, हा समज चुकीचा ठरतो. लोकांच्या मनात असंतोष असेल तर तो व्यक्त होण्यासाठी राजकीय पक्षांचीच आवश्यकता असते असे नाही. विद्यार्थी, युवक किंवा सामाजिक संघटनाही जनभावना प्रभावीपणे मांडू शकतात.

त्यामुळे सत्ताधाऱ्यांनी जमिनीवरील वास्तवाशी सतत संपर्क ठेवणे आवश्यक आहे. कोणत्याही सरकारसाठी स्तुतिपाठकांचा गराडा धोकादायक ठरतो. केवळ सकारात्मक चित्र दाखवणारी व्यवस्था आणि सरकारधार्जिणी वातावरणामुळे वास्तविक समस्या दुर्लक्षित राहतात. माध्यमे आणि प्रशासनाने वस्तुस्थितीचा आरसा दाखवण्याची भूमिका पार पाडली नाही, तर सत्ताधाऱ्यांचा वास्तवाशी संपर्क तुटण्याचा धोका वाढतो. अशा वेळी जनतेचा उद्रेक हा शासनासाठी इशारा ठरतो. विद्यार्थ्यांच्या आंदोलनाने हेच दाखवून दिले की समाजातील दडपलेली नाराजी एका क्षणी उफाळून येऊ शकते. माहिती तंत्रज्ञान, प्रचारयंत्रणा किंवा समाजमाध्यमांवर उभे केलेले आभासी चित्र हे प्रत्यक्ष जनभावनांची जागा घेऊ शकत नाही. लोकशाहीत शेवटी जनतेचा अनुभव आणि विश्वास हाच अंतिम निकष असतो.

म्हणूनच पेपरफुटीच्या निमित्ताने उभे राहिलेले हे आंदोलन केवळ एका परीक्षेपुरते मर्यादित नाही. ते शासनाला वास्तवाची जाणीव करून देणारा इशारा आहे. लोकांच्या अपेक्षा, विद्यार्थ्यांचे भविष्य आणि प्रशासनावरील विश्वास टिकवण्यासाठी पारदर्शकता, उत्तरदायित्व आणि संवाद यांनाच प्राधान्य द्यावे लागेल. अन्यथा आभासी वास्तवाचा भंग होऊन जनतेचे खरे वास्तवच प्रत्येक सत्ताधाऱ्यासमोर उभे राहील.

## प्रासंगिक »

### समाधान

**एकदा काही कोळिणी मासळी विकून गावाकडे परतत होत्या. रात्र झाल्याने वाटेत एका फुलबागेजवळ राहणाऱ्या वृद्ध माळ्याने त्यांना आपल्या झोपडीत मुक्काम करण्यास सांगितले.**

दिवसभराच्या थकव्यामुळे त्यांनी त्याचे आमंत्रण स्वीकारले. झोपडीच्या एका कोपऱ्यात चमेलीच्या फुलांनी भरलेल्या टोपल्या होत्या. त्या फुलांचा दरवळ संपूर्ण झोपडीत पसरला होता. मात्र आश्चर्य म्हणजे, सुगंध असूनही कोळिणींना झोप लागत नव्हती. त्या सारख्या कुशी बदलत होत्या. शेवटी एका कोळिणीने आपल्या मासळीच्या टोपलीवर थोडे पाणी शिंपडले आणि ती टोपली उशाशी ठेवली.

मासळीचा परिचित वास येताच तिला लगेच गाढ झोप लागली. इतर कोळिणींनीही तसेच केले आणि त्यांनाही शांत झोप लागली. या प्रसंगातून प्रत्येक व्यक्तीचे समाधान, आवड आणि सवय वेगळी असते, हे स्पष्ट होते. एखादी गोष्ट एका व्यक्तीस आनंद देत असली, तरी ती दुसऱ्याला तशीच वाटेलच असे नाही. त्यामुळे दुसऱ्यांच्या आवडीनिवडींचा आदर करणे आणि त्यांच्या स्वभावाचा स्वीकार करणे, हाच खरा शहाणपणा आहे.

- तात्पर्य : **समाधान हे प्रत्येकाच्या सवयी आणि मनोवृत्तीवर अवलंबून असते.**

महाराष्ट्राच्या एमएचटी-सीईटी परीक्षेतील गुणपत्रिकेचा गोंधळ आणि एका विद्यार्थ्याला दोन वेगवेगळ्या गुणपत्रिका मिळाल्याची घटना परीक्षा व्यवस्थेवरील विश्वास डळमळीत करणारी आहे.

# सीईटी गोंधळ; व्यवस्थेचे अपयश उघड



एका रात्रीत पर्सेंटाइलमध्ये मोठा फरक पडणे ही केवळ तांत्रिक चूक मानता येणार नाही. मुंबई उच्च न्यायालयाने या प्रकरणाची गंभीर दखल घेत सीईटी सेलला फटकारले, ही विद्यार्थ्यांसाठी दिलासादायक बाब असली तरी अशा घटनाच घडू नयेत, हीच खरी अपेक्षा आहे.

गेल्या काही वर्षांत नीट, टीईटी आणि आता सीईटी अशा अनेक महत्त्वाच्या परीक्षांभोवती वाद निर्माण झाले आहेत. पेपरफुटी, निकालातील विसंगती, गुणपत्रिकांमधील तफावत आणि पारदर्शकतेचा अभाव यामुळे विद्यार्थी आणि पालकांमध्ये अस्वस्थता वाढली आहे. लाखो विद्यार्थ्यांच्या भविष्याचा निर्णय घेणाऱ्या परीक्षा व्यवस्थेने विश्वासार्ह असणे आवश्यक असताना, त्याच व्यवस्थेवर संशय निर्माण होणे ही अत्यंत गंभीर बाब आहे.

यापेक्षाही चिंतेची गोष्ट म्हणजे संबंधित परीक्षा यंत्रणा सुरुवातीला चुका मान्य करण्याऐवजी त्यांचे समर्थन करण्याचा प्रयत्न करतात. न्यायालयाचा हस्तक्षेप झाल्यानंतरच कारवाईची हालचाल सुरू होते. ही प्रवृत्ती बदलणे आवश्यक आहे. चुकीची कबुली देऊन तत्काळ दुरुस्ती करणे, ही कोणत्याही जबाबदार संस्थेची प्राथमिक जबाबदारी असली पाहिजे.परीक्षा प्रक्रियेतील प्रत्येक टप्पा अधिक पारदर्शक आणि तांत्रिकदृष्ट्या सुरक्षित करणे ही काळाची गरज आहे. गुणपत्रिका, पर्सेंटाइल आणि निकाल तयार करण्याच्या प्रक्रियेत स्वतंत्र लेखापरीक्षण, डिजिटल नोंदी आणि अधिकाऱ्यांचे स्पष्ट उत्तरदायित्व निश्चित केले पाहिजे. विद्यार्थ्यांना निकाल पडताळणीसाठी प्रभावी यंत्रणाही उपलब्ध करून देणे गरजेचे आहे.

देशातील तरुणांच्या भविष्याशी संबंधित परीक्षा व्यवस्थेवर विश्वास टिकवणे हे सरकार आणि परीक्षा मंडळांचे सर्वोच्च कर्तव्य आहे. प्रत्येक वेळी न्यायालयाच्या हस्तक्षेपानंतरच चुका दुरुस्त होणार असतील, तर ती व्यवस्थेची मोठी शोकांतिका ठरेल. तात्पुरत्या उपायांऐवजी व्यापक सुधारणा करून परीक्षा प्रक्रिया निष्पक्ष, पारदर्शक आणि विश्वासार्ह बनवणे हीच आजची सर्वात मोठी गरज आहे. लाखो विद्यार्थ्यांच्या कष्टांचा आणि स्वप्नांचा सन्मान राखण्यासाठी परीक्षा व्यवस्थेला लागलेली ही वाळवी वेळीच नष्ट करणे अपरिहार्य आहे.

## ।। अभंगवाणी ।।



दुजें खंडे तरी । उरला तो अवघा हरि ॥
आपणाबाहेरी । न लगे ठाव धुंडावा ॥१॥

इतुलें जाणावया जाणा । कोंडें तरी मनें मना ॥
पारधीच्या खुणा । जाणतें चि साधावे ॥ध्रु.॥

**- संत तुकाराम**

**महाईन्यूज** हे डिजिटल वृत्तपत्र **संस्थापक-संपादक श्री. अधिकराव दिवे-पाटील** यांनी छत्रपती शिवाजी महाराज गोल मंडई, गाळा क्र. ७९/८०, संत तुकारामनगर, पिंपरी, पुणे-४११०१८ येथे पुणे विभागीय कार्यालयामधून प्रसिद्ध केले आहे. एमएसएमई नोंदणी क्रमांक : MH-26-0158827. या वृत्तपत्रात डिजीटल स्वरूपात मुद्रीत केलेले लेख, बातम्या तसेच लेखनाशी किंवा विचारांशी संस्थापक-संपादक सहमत असतीलच असे नाही.
**मुख्य कार्यकारी संपादक : वैष्णव जाधव | वृत्त संपादक : अविनाश आदक.** (सर्व बातम्यांची, लेखांची व लेखनाची जबाबदारी यांची राहील.) विशेष सूचना : हा अंक कोणत्याही प्रकारच्या प्रिंटसाठी नाही. गौरवापर केल्यास कायदेशीर कारवाई केली जाईल.

# यालाच जंतर-मंतर म्हणतात; राज ठाकरे

## राज ठाकरेंचं शरद पवार-नरेंद्र मोदींच्या भेटीवर उद्देशून सूचक भाष्य

**महाईन्यूज । मुंबई**

**दिल्लीतल्या जंतर मंतर या ठिकाणी सीजेपीच्या नेतृत्त्वात विद्यार्थ्यांचं आंदोलन सुरु आहे. नीट पेपरफुटी, परीक्षा पद्धतीतील अनास्था, विद्यार्थ्यांच्या आत्महत्या या सगळ्या मुद्द्यांवर हे आंदोलन सुरु आहे. धर्मेंद्र प्रधान यांनी राजीनामा दिला पाहिजे अशी मागणी विद्यार्थ्यांनी केली आहे. या आंदोलनाला सोमवारी हिंसक वळण लागलं. कारण विद्यार्थ्यांनी संसदेवर मोर्चा नेला होता त्यावेळी लाठीचार्ज करण्यात आला. यानंतर काँग्रेसनेही आंदोलन केलं.**



या सगळ्या घटना घडत असताना शरद पवार यांनी बुधवारी पंतप्रधान नरेंद्र मोदींची भेट घेतली. शरद पवारांच्या भेटीबाबत राज ठाकरेंना प्रश्न विचारला असता त्यांनी याबाबत प्रतिक्रिया दिली आहे.

शरद पवार यांच्या एक्स हँडलवर त्यांनी या भेटीमागचा उद्देश आणि प्रत्यक्ष भेटीत कोणती चर्चा झाली, याची माहिती दिली. त्यांनी लिहिले, नीट (NEET) परीक्षेतील पेपरफुटीच्या पार्श्वभूमीवर विद्यार्थ्यांनी केलेले आंदोलन, त्या आंदोलनादरम्यान पोलिसांकडून विद्यार्थ्यांना देण्यात आलेली अयोग्य वागणूक, विद्यार्थ्यांवर दाखल करण्यात आलेले गुन्हे यासंदर्भात पंतप्रधान मोदींशी चर्चा केली. देशातील आणि महाराष्ट्रातील शेती क्षेत्रातील प्रशासकीय व धोरणात्मक त्रुटी, शेतकऱ्यांच्या गंभीर समस्या व विविध प्रलंबित मागण्या या गंभीर विषयांवर चर्चा केली, असेही शरद पवार यांनी लिहिले. शरद पवारांनी मोदींच्या भेटीबाबत स्पष्टीकरण दिलं असलं तरीही राजकीय वर्तुळात चर्चा सुरु झाल्या आहेत. राज ठाकरेंनीही या भेटीवर सूचक भाष्य केलं.

देशभरात सुरू असलेल्या विद्यार्थ्यांच्या आंदोलनाच्या पार्श्वभूमीवर महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे अध्यक्ष राज ठाकरे यांनी केंद्र सरकारवर जोरदार टीका केली आहे. विद्यार्थ्यांचे आंदोलन दडपण्याचा प्रयत्न होत असल्याचा आरोप करत, सत्तेवर असणाऱ्यांनी केवळ अधिकारच नव्हे तर अपयशाची जबाबदारीही स्वीकारली पाहिजे, असे ते म्हणाले.

शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांच्यासोबत शिवतीर्थ येथील निवासस्थानी झालेल्या संयुक्त पत्रकार परिषदेत राज ठाकरे यांनी विद्यार्थ्यांच्या आंदोलनासह शिक्षण व्यवस्थेतील प्रश्नांवर भाष्य केले.

राज ठाकरे म्हणाले की, गेल्या काही दिवसांपासून देशभरात विद्यार्थी आपल्या मागण्यांसाठी आंदोलन करत आहेत. सुरुवातीला हे आंदोलन शांततापूर्ण होते, मात्र त्यानंतर आंदोलनकर्त्यांवर दबाव आणण्याचे आणि आंदोलन मोडून काढण्याचे प्रयत्न झाल्याचा आरोप त्यांनी केला. विद्यार्थ्यांवरील कारवाईचे पडसाद देशभर उमटत असून महाराष्ट्र आणि मुंबईतही त्याचे परिणाम दिसत असल्याचे त्यांनी नमूद केले.

### राज ठाकरे काय म्हणाले?

दिल्लीत आंदोलन सुरु असताना शरद पवार आणि सुप्रिया सुळे यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदींची दिल्लीत बुधवारी भेट घेतली. त्याबाबत प्रश्न विचारला असता, यालाच जंतर-मंतर असं म्हणतात हे उत्तर दिलं. शरद पवार यांच्याबाबत राज ठाकरेंनी हे भाष्य करताच उपस्थित पत्रकारांना हशा पिकला. जंतर-मंतर हे दिल्लीच्या मैदानाचं नाव आहे. तर जंतर-मंतर या शब्दाचा अर्थ जादू किंवा किमया असाही होतो. राज ठाकरेंनी एका अर्थाने शरद पवार हे राजकारणात काहीही करु शकतात असं म्हणत अवघ्या तीन शब्दात प्रतिक्रिया दिली आहे.

## काही कलाकार फक्त ‘रील’ बनवून प्रसिद्धी मिळवण्यासाठी CJP आंदोलनात

**महाईन्यूज । मुंबई**

**महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आज दुपारी मुंबईत पत्रकारांशी संवाद साधताना विविध मुद्द्यांवरून विरोधकांवर जोरदार निशाणा साधला. “विरोधक आंदोलनांच्या भरवशावर आपली राजकीय पोळी भाजण्याचे काम करत आहेत.**



थेट आरोप करत त्यांनी काँग्रेस नेते राहुल गांधी यांना पळपुटेपणा सोडून संसदेत समोरासमोर चर्चा करण्याचे खुले आव्हान दिले. “जर तुमची लोकशाही आणि संविधानावर निष्ठा असेल, तर विरोधकांनी चर्चेपासून दूर का पळावे?” असा सवालही मुख्यमंत्र्यांनी या वेळी उपस्थित केला.

राहुल गांधी यांच्या कार्यपद्धतीवर टीका करताना मुख्यमंत्री म्हणाले, “राहुल गांधी हे अराजकतावादी मानसिकतेतून काम करत आहेत. कर्नाटक आणि पंजाब या काँग्रेसशासित राज्यांमध्येही पेपर फुटीच्या घटना घडल्या आहेत, पण काँग्रेस यावर केवळ राजकारण करत आहे. काँग्रेस सरकारच्या काळात शिक्षणाचे बजेट अत्यंत कमी होते, जे आमच्या सरकारने सत्तेत आल्यानंतर मोठ्या प्रमाणावर वाढवले आहे.”

मनसे प्रमुख राज ठाकरे यांच्या विधानाचा समाचार घेताना मुख्यमंत्री म्हणाले, “जेव्हापासून राज ठाकरे आणि शरद पवार यांच्यातील अंतर वाढले आहे, तेव्हापासून राज ठाकरेंना सगळीकडे ‘जंतर-मंतर’च दिसत आहे.”

माजी मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांच्यावर निशाणा साधताना फडणवीस यांनी TET परीक्षेतील गैरव्यवहाराची आठवण करून दिली. “उद्धव ठाकरे मुख्यमंत्री असताना राज्यात आतापर्यंतचा सर्वांत मोठा TET (शिक्षक पात्रता परीक्षा) घोटाळा झाला होता,” असा टोला त्यांनी लगावला.

### CJP आंदोलनातील कलाकारांचा सहभाग कशासाठी?

सध्या सुरू असलेल्या आंदोलनांमधील कलाकारांच्या सहभागावर भाष्य करताना मुख्यमंत्र्यांनी आपली भूमिका मांडली. “आंदोलनामध्ये सर्व प्रकारच्या प्रवृत्ती असतात. अनेक कलाकार अतिशय चांगल्या भावनेने आणि प्रामाणिकपणे आंदोलनात उतरले आहेत. मात्र, दुर्दैवाने अनेक जण केवळ ‘रील’ बनवण्यासाठी आणि आंदोलनाचा वापर स्वतःच्या प्रसिद्धीसाठी करताना दिसत आहेत,” असे ते म्हणाले.

# सरकारकडून कोंडी सोडवण्याचा प्रयत्न

## आंदोलकांवर कोणतीही कायदेशीर कारवाई न करण्याचे आश्वासन दिल्यास उपोषण मागे

**महाईन्यूज । नवी दिल्ली**

**कॉक्रोच जनता पार्टीच्या आंदोलनात सहभागी आंदोलकांवर कायदेशीर कारवाई न करण्याचे तसेच सरकारने दिलेली इतर आश्वासने पूर्ण करण्यात आली तर मी उपोषण संपवेन, असे सोनम वांगचुक यांनी बुधवारी म्हटले आहे. सरकारने जर आश्वासन दिले तर विद्यार्थ्यांना ही चळवळ तूर्तास थांबवायला तसेच सरकारशी चर्चा करायला सांगेन, असे सोनम वांगचुक म्हणाले. सोमवारी (२० जुलै) नवी दिल्लीत झालेल्या आंदोलनानंतर सरकारने आंदोलकांच्या नेतृत्वाशी चर्चा करण्यास सुरूवात केली आहे.**



सोनम वांगचुक यांनी केंद्रीय मंत्री जेपी नड्डा आणि जितेंद्र सिंग यांच्या नावे पत्र लिहिले आहे. या दोन्ही केंद्रीय मंत्र्यांनी मंगळवारी रात्री मेदांता रूग्णालयात वांगचुक यांची भेट घेतली होती. नीट पेपरफुटीनंतर आत्महत्या केलेल्या विद्यार्थ्यांच्या कुटुंबियांना नुकसान भरपाई दिली जाईल आणि संसदेत केंद्रीय शिक्षण मंत्री धर्मेंद्र प्रधान यांच्या राजीनाम्यासह इतर मुद्द्यांवर चर्चा केली जाईल असे आश्वासन या मंत्र्यांनी दिल्याचे वांगचुक यांनी पत्रात म्हटले आहे.

हे पत्र प्रसारित झाल्यानंतर आमच्या मागण्या जोपर्यंत मान्य होत नाहीत, तोपर्यंत माघार घेणार नसल्याची भूमिका कॉक्रोच जनता पार्टीने (CJP) घेतली. सीजेपीने वांगचुक यांच्याप्रमाणेच काही मागण्या केल्या. आत्महत्याग्रस्त विद्यार्थ्यांच्या कुटुंबियांना एक कोटी रूपयांची मदत, शांततापूर्ण मार्गाने आंदोलन करणाऱ्यांवर कोणताही गुन्हा दाखल न करणे, आंदोलकांवर कारवाई करणाऱ्या पोलिस अधिकाऱ्यांवर कारवाई करणे या मागण्या सीजेपीने केल्या आहेत. एखाद्या कार्यालयात किंवा घरात मंत्र्यांबरोबर बैठक घेणार नाही, एका स्वतंत्र ठिकाणी भेटण्यासाठी आम्ही तयार होऊ, असे सीजेपीचे प्रवक्ता सौरभ दास यांनी म्हटले होते. नड्डा यांच्या अधिकृत निवासस्थानी बैठक घेण्याचे भाजपाने सुचवले होते. दरम्यान, सीजेपी व सरकारमध्ये चर्चा झाल्याची माहिती भाजपातील सूत्रांनी दिली होती. परंतु, नड्डा यांनी पत्रकार परिषदेत आज कोणतीही चर्चा झाली नाही, अशी माहिती दिली. सोमवारी सीजेपीच्या प्रतिनिधींशी झालेल्या चर्चेवर नड्डा म्हणाले होते, "चर्चा एका चांगल्या वातावरणात झाली. आम्ही त्यांचे म्हणणे शांतपणे ऐकून घेतले. मी त्यांना सांगितले, तुमच्या मागण्या लिखित स्वरूपात द्या. तसेच मी त्यांना म्हणालो जेव्हा केव्हा तुम्हाला माझ्याशी बोलावे वाटेल तेव्हा बोलू शकता."

### वांगचुक यांच्या पत्रात काय?

सोनम वांगचुक यांनी पत्रात म्हटले की, विविध पक्षांतील जवळपास ६५ खासदारांनी मला लेखी संदेश पाठवला. त्यातील काही जण भेटण्यासाठी आले होते. त्यांनी मला उपोषण सोडण्याचा आग्रह केला. तसेच मला ही जाणीव करून दिली की मला देशसेवेचे आणखी काम करायचे आहे. मी त्यांच्याशी सहमत आहे. मला जगण्याची इच्छा आहे. माझ्या विद्यार्थ्यांकडे मला परत जायचे आहे. माझं जीवन घडवणाऱ्या शिक्षण आणि कामाकडे मला परत जायचे आहे. पण, ज्यांच्यासाठी ही चळवळ सुरू झाली त्या तरूणांना सोडून मी जाऊ शकत नाही.

# न्यूयॉर्कमध्ये पाय ठेवताच नेतान्याहूंना अटक करण्याचे ममदानींचे वचन

**महाईन्यूज । अमेरिका**

**न्यूयॉर्कचे महापौर जोहरान ममदानी यांनी मंगळवारी (जुलै २१) एक व्हिडिओ पोस्ट केला. त्यात ते म्हणाले, की त्यांचे प्रशासन आंतरराष्ट्रीय गुन्हेगारी न्यायालयाने इस्रायलचे पंतप्रधान नेतान्याहू यांच्या विरोधात काढलेल्या वॉरंटचे पालन करू शकत नाही. नेतान्याहू यांना जोहरान ममदानी यांनी "युद्ध गुन्हेगार" म्हटले आहे. महापौर पदाच्या निवडणुकीच्या प्रचारात जोहरान ममदानी यांनी नेतान्याहू यांना अटक करण्याबाबत अनेकदा वक्तव्य केले होते.**



### नेतान्याहूंच्या अटकेचे वॉरंट का काढले?

आंतरराष्ट्रीय गुन्हेगारी न्यायालयाने नोव्हेंबर २०२४ मध्ये नेतान्याहू यांच्या अटकेचे वॉरंट जारी केले होते. नेतान्याहू यांच्यावर युद्धाचा गुन्हा आणि मानवतेविरोधात कृत्ये केल्याचा आरोप लावण्यात आला होता. ७ ऑक्टोबरच्या हल्ल्यानंतर इस्रायली लष्कराने गाझामध्ये जी लष्करी मोहीम सुरू केली होती, त्यामुळे त्यांच्यावर हे आरोप करण्यात आले होते. आंतरराष्ट्रीय गुन्हेगारी न्यायालयाकडे स्वत:चे पोलीस दल नाही. त्यामुळे नेतान्याहू यांना अटक होण्यासाठी न्यायालय त्याच्या सदस्य देशांवर अवलंबून आहे. या न्यायालयाचे एकूण १२५ देश सदस्य आहेत.

नेतान्याहू यांनी न्यूयॉर्कमध्ये पाय ठेवताच त्यांना अटक करू, असे आश्वासन ममदानी यांनी दिले होते. त्यांच्या टीमने या बाबतीत प्रत्येक कायदेशीर बाबीचा अभ्यास केला आहे, असे मंगळवारी ममदानी म्हणाले.

"हे स्पष्ट आहे की, या वॉरंटचे पालन करण्याचा आम्हाला स्वतंत्र कायदेशीर अधिकार नाही. पण, फेडरल सरकारला (ट्रम्प सरकारला) त्याचे पालन करता येऊ शकते. आंतरराष्ट्रीय गुन्हेगारी न्यायालयाच्या वॉरंटचे पालन करा असे आवाहन मी त्यांना करतो", असे जोहरान ममदानी व्हिडिओत म्हणाले. नेतान्याहू यांचे न्यूयॉर्क शहरात स्वागत केले जाणार नाही, असेही त्यांनी स्पष्ट केले आहे.

अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प सोमवारी म्हणाले, नेतान्याहू यांना अटक होणार नाही. कोणत्याही परिस्थितीत, कोणत्याही मार्गाने, कोणत्याही प्रकारे त्यांना अमेरिकेत अटक होणार नाही, असे ट्रम्प यांनी स्पष्ट केले. संयुक्त राष्ट्रसंघाच्या सर्वसाधारण बैठकीला उपस्थित राहण्यासाठी नेतान्याहू सप्टेंबर महिन्यात न्यूयॉर्कला जाणार आहेत. यापूर्वी याच बैठकीसाठी नेतान्याहू न्यूयॉर्कला गेले होते. त्यावेळीही त्यांच्यावर आंतरराष्ट्रीय गुन्हेगारी न्यायालयाच्या वॉरंटची टांगती तलवार होती.

दरम्यान, अमेरिका व इस्रायल हे या न्यायालयाचे सदस्य देश नाहीत. त्यामुळे या वॉरंटचे पालन करण्याची कोणतीही जबाबदारी त्यांच्यावर नाही. त्यामुळे अमेरिका या वॉरंटला गांभीर्याने घेत नाही.

नेतान्याहू हे गाझा युद्धासाठी जबाबदार असून त्यांनी लोकांना उपाशी ठेवून मारण्याची रणनीती युद्धात वापरली, असे आंतरराष्ट्रीय गुन्हेगारी न्यायालयाने म्हटले आहे. ८ ऑक्टोबर २०२३ ते २० मे २०२४ दरम्यान नेतान्याहू यांनी सामान्य नागरिकांवर हल्ले करण्याचे निर्देश दिल्याचे न्यायालयाने नमूद केले. मानवतेच्या विरोधात जाऊन हत्या, छळ आणि इतर अमानुष कृत्ये या कालावधीत घडल्याचे न्यायालयाने म्हटले. इस्रायलचे माजी संरक्षण मंत्री योआव गॅलांट यांच्यावरही सारखेच गुन्हे नोंद करण्यात आले. महापौर पदाची निवडणूक लढताना ममदानी यांनी सर्वप्रथम नेतान्याहू यांना अटक करण्याची कल्पना बोलून दाखवली होती.

# कॉकरोचसाठी पोलिसांना एकटीच नडली!



दिल्लीतील जंतर मंतरवर सुरू असलेल्या नीट परीक्षेतील कथित पेपरफुटीविरोधातील आंदोलनाची धग आता देशभर पोहोचताना दिसत आहे. केंद्रीय शिक्षणमंत्री धर्मेंद्र प्रधान यांच्या राजीनाम्याची मागणी करत सुरू असलेल्या या आंदोलनादरम्यान मुंबईतील एक व्हिडिओ सध्या सोशल मीडियावर तुफान व्हायरल होत आहे. या व्हिडिओमध्ये एक तरुणी चक्क एका हाताने पोलिसांची व्हॅन रोखून धरताना दिसत आहे. तिच्या या धाडसाचे देशभरातून कौतुक होत असून, अनेकांनी या घटनेतून 'कॉकरोच जनता पार्टी'च्या आंदोलनाची ताकद दिसून येत असल्याचे म्हटले आहे. हा व्हायरल व्हिडिओ मुंबईतील दादर परिसरातील शिवाजी पार्क येथील असल्याचे सांगितले जात आहे. मुंबईत मुसळधार पाऊस सुरू असतानाही नीट परीक्षेतील कथित गैरव्यवहार आणि पेपरफुटीच्या मुद्द्यावर आंदोलक मोठ्या संख्येने एकत्र आले होते. यावेळी पोलिसांनी काही आंदोलकांना ताब्यात घेतले. त्याचवेळी रिया यादव नावाची तरुणी हुडी आणि कॅप घालून थेट पोलिसांच्या व्हॅनसमोर जाऊन उभी राहिली. व्हायरल व्हिडिओमध्ये रिया यादव पोलिसांच्या व्हॅनला पुढे जाण्यापासून रोखताना दिसत आहे. विशेष म्हणजे, एका हाताने तिने व्हॅनला धरून ठेवले असून, दुसऱ्या हातात तिचा मोबाईलही दिसत आहे. काही काळ ती पोलिसांची व्हॅन पुढे जाऊ देत नाही. त्यामुळे पोलिसांच्या ताब्यात असलेल्या काही आंदोलकांना बाहेर पडण्यासाठी वेळ मिळाल्याचे सांगितले जात आहे. या घटनेनंतर रिया यादवचा व्हिडिओ सोशल मीडियावर वेगाने व्हायरल झाला. अनेकांनी तिच्या धैर्याचे कौतुक करत तिला 'सुपरगर्ल' म्हटले आहे. 'एकटी मुलगी पोलिसांच्या संपूर्ण व्हॅनसमोर उभी राहिली', अशा प्रतिक्रिया सोशल मीडियावर उमटत आहेत. व्हिडिओमध्ये रिया यादव पोलिसांच्या कारवाईवर प्रश्न उपस्थित करताना दिसते. "ते लोक आपलं काम करत आहेत, पण जबाबदारीने काम करत नाहीत. नागरिकांची जबाबदारीही त्यांचीच आहे," असे ती म्हणताना दिसत आहे. रिया यादवने आपल्या इंस्टाग्राम प्रोफाइलवर स्वतःला मॉडेल आणि अभिनेत्री म्हणून नमूद केले आहे. तिचे इंस्टाग्रामवर जवळपास १ लाख फॉलोअर्स आहेत. ती 'दिलबरा' या प्रसिद्ध म्युझिक व्हिडिओमध्ये झळकली आहे. ती हाताने तयार केलेल्या कपड्यांचा व्यवसाय करते आणि 'रियासत' नावाचा स्वतःचा फॅशन ब्रँड चालवते. आंदोलना दरम्यान ती पोलिसांच्या व्हॅनसमोर उभी राहिल्याचा हा व्हिडिओ त्याच ठिकाणी उपस्थित असलेल्या एका विद्यार्थ्याने शूट केला. त्यानंतर हा व्हिडिओ सोशल मीडियावर मोठ्या प्रमाणात शेअर करण्यात आला. या व्हिडिओमुळे नीट परीक्षेतील कथित गैरव्यवहाराचा मुद्दा पुन्हा एकदा राष्ट्रीय स्तरावर चर्चेत आला असून, सोशल मीडियावर या घटनेवर विविध प्रतिक्रिया उमटत आहेत.



## सूर्या यांच्या निर्णयाने बदलला वडिलांचा निर्णय

दाक्षिणात्य चित्रपटसृष्टीतील लोकप्रिय अभिनेता सूर्या आणि अभिनेत्री ज्योतिका यांची जोडी चाहत्यांची कायमच आवडती राहिली आहे. पडद्यावरील त्यांची केमिस्ट्री जितकी गाजली, तितकीच त्यांच्या खऱ्या आयुष्यातील प्रेमकथाही प्रेरणादायी मानली जाते. आज त्यांच्या लग्नाला जवळपास दोन दशके पूर्ण झाली असली, तरी त्यांचे नाते आजही तितकेच मजबूत आणि प्रेमळ आहे. मात्र, हे नाते जुळवण्यासाठी दोघांनाही अनेक अडचणींचा सामना करावा लागला होता. सूर्या आणि ज्योतिकाची पहिली भेट १९९९ मध्ये 'पूवेल्लम केट्टुप्पर' या चित्रपटाच्या शूटिंगदरम्यान झाली. त्यावेळी दोघेही करिअरच्या सुरुवातीच्या टप्प्यात होते. सुरुवातीला त्यांच्यात मैत्री झाली आणि एकमेकांसोबत वेळ घालवत असताना ही मैत्री हळूहळू प्रेमात बदलली. जवळपास सात वर्षे एकमेकांना समजून घेतल्यानंतर त्यांनी लग्न करण्याचा निर्णय घेतला आणि ११ सप्टेंबर २००६ रोजी विवाहबंधनात अडकले. मात्र, त्यांच्या या नात्याला सुरुवातीला सूर्या यांच्या कुटुंबाचा, विशेषतः वडील आणि ज्येष्ठ अभिनेते शिवकुमार यांचा विरोध होता. त्यांनी एका मुलाखतीत सांगितले होते की, सुरुवातीला त्यांना हे लग्न मान्य नव्हते. त्यामुळे सूर्या आणि ज्योतिकाला आपल्या नात्यासाठी मोठा संघर्ष करावा लागला. या काळात सूर्या आपल्या निर्णयावर ठाम राहिले. त्यांनी स्पष्टपणे सांगितले होते की, जर त्यांचे लग्न ज्योतिकाशी झाले नाही, तर ते आयुष्यभर लग्न करणार नाहीत. मुलाचा हा ठाम निर्धार पाहून अखेर शिवकुमार यांचे मत बदलले. आपल्या चित्रपटांमधून नेहमी प्रेमाचा विजय दाखवणारा मी, स्वतःच्या मुलाच्या प्रेमाला विरोध कसा करू, असा विचार त्यांच्या मनात आला आणि त्यांनी या नात्याला अखेर संमती दिली.

# विद्यार्थी आंदोलनाच्या समर्थनार्थ स्वरा



नीट (NEET) पेपर लीक प्रकरण आणि केंद्रीय शिक्षण मंत्र्यांच्या राजीनाम्याच्या मागणीसाठी सुरू असलेल्या CJPच्या विद्यार्थी आंदोलनाला आता अनेक सेलिब्रिटींचा पाठिंबा मिळत आहे. बॉलिवूड अभिनेत्री स्वरा भास्कर हिनेही या आंदोलनाला उघडपणे समर्थन देत सरकारच्या कारवाईवर गंभीर प्रश्न उपस्थित केले आहेत. विद्यार्थ्यांशी होत असलेल्या वागणुकीबाबत तिने नाराजी व्यक्त करत, लोकशाहीत विद्यार्थ्यांचा आवाज दडपला जाऊ नये, असे मत मांडले आहे. दिल्लीतील जंतर-मंतर येथे अनेक दिवसांपासून विद्यार्थी आंदोलन सुरू आहे. नीट पेपर लीक प्रकरणाची निष्पक्ष चौकशी व्हावी आणि जबाबदारांवर कठोर कारवाई करावी, अशी आंदोलनकर्त्यांची प्रमुख मागणी आहे. या आंदोलनादरम्यान काही विद्यार्थी संसदेकडे मोर्चा घेऊन जात असताना पोलिसांनी त्यांना अडवले. त्यावेळी पोलिस आणि आंदोलनकर्त्यांमध्ये धक्काबुक्की झाल्याचे तसेच पोलिसांनी बळाचा वापर केल्याचे काही व्हिडिओ सोशल मीडियावर व्हायरल झाले. या घटनांनंतर देशभरातून विविध प्रतिक्रिया उमटू लागल्या. याच पार्श्वभूमीवर स्वरा भास्करने आपल्या इन्स्टाग्राम अकाउंटवर एक व्हिडिओ शेअर करत सरकारच्या भूमिकेवर टीका केली. तिने म्हटले की, विद्यार्थी आपल्या मागण्या लोकशाही मार्गाने मांडत आहेत. अशा वेळी त्यांच्या विरोधात मोठ्या प्रमाणावर सुरक्षा दल तैनात करणे योग्य नाही. विद्यार्थ्यांना देशासाठी धोका समजण्याऐवजी त्यांच्या समस्या ऐकून घेणे आणि त्यावर तोडगा काढणे ही सरकारची जबाबदारी आहे, असे तिने स्पष्ट केले. स्वरा भास्करने पुढे असेही म्हटले की, विद्यार्थ्यांचा आवाज दडपण्याचा प्रयत्न करणे हे लोकशाहीच्या मूलभूत मूल्यांच्या विरोधात आहे. देशातील तरुण आपल्या शिक्षणाशी संबंधित प्रश्नांवर आंदोलन करत असतील, तर त्यांच्याशी संवाद साधणे आवश्यक आहे. त्यांच्या मागण्यांकडे दुर्लक्ष करून कठोर कारवाई करणे योग्य नसल्याचे तिने सांगितले. स्वराच्या या भूमिकेनंतर सोशल मीडियावर तिच्या वक्तव्याची मोठी चर्चा सुरू झाली आहे. काहींनी तिच्या मताचे समर्थन केले असून विद्यार्थ्यांच्या प्रश्नांकडे सरकारने गांभीर्याने पाहावे, असे म्हटले आहे. तर काहींनी सरकारच्या कारवाईचे समर्थन करत कायदा आणि सुव्यवस्था राखण्यासाठी पोलिसांनी आवश्यक ती पावले उचलल्याचे मत व्यक्त केले आहे. त्यामुळे या विषयावर सोशल मीडियावर दोन्ही बाजूंनी जोरदार चर्चा रंगली आहे. विद्यार्थी आंदोलनाला पाठिंबा देणाऱ्या सेलिब्रिटींची संख्या देखील वाढत आहे. यापूर्वी नसीरुद्दीन शाह, शबाना आझमी, प्रकाश राज, प्रीती झिंटा, सोनू सूद, रितेश देशमुख, जेनेलिया देशमुख, भूमि पेडणेकर, हुमा कुरेशी, ऋचा चड्ढा आणि दिलजीत दोसांझ यांसारख्या अनेक कलाकारांनी विद्यार्थ्यांच्या आंदोलनाबाबत आपली भूमिका सोशल मीडियावर मांडली आहे.

# WTC फायनलची घोषणा!

## ९ जूनपासून रंगणार महामुकाबला; ऑस्ट्रेलिया अव्वल स्थानावर

**महाईन्यूज । इंग्लंड**

**जागतिक कसोटी अजिंक्यपद स्पर्धा म्हणजेच वर्ल्ड टेस्ट चॅम्पियनशिप २०२५-२७ च्या अंतिम सामन्यासंबंधित महत्त्वाची माहिती आयसीसीने रिलीज केली आहे. पुढच्या वर्षी होणाऱ्या वर्ल्ड टेस्ट चॅम्पियनशिपची तारीख व ठिकाण आयसीसीने सांगितलं आहे. यासाठीची तयारी आधीच सुरू झाली आहे. विजेतेपदासाठीच्या लढतीला अजून वेळ असला आणि अंतिम सामन्यातील संघ अद्याप निश्चित झालेले नसले तरीही WTC (जागतिक कसोटी अजिंक्यपद) अंतिम सामन्याची तारीख आणि ठिकाण आधीच जाहीर करण्यात आलं आहे.**




जागतिक कसोटी अजिंक्यपद स्पर्धेचा अंतिम सामना या वेळीही इंग्लंडमध्येच खेळवला जाणार असल्याचं निश्चित झालं आहे. जागतिक कसोटी अजिंक्यपद स्पर्धेचं (WTC) चौथं चक्र सध्या सुरू आहे. दरम्यान, आयसीसीने (ICC) जाहीर केलं आहे की या स्पर्धेचा अंतिम सामना पुढील वर्षी खेळवला जाईल. गुणतालिकेतील अव्वल दोन संघांमध्ये हा विजेतेपदाचा सामना रंगणार असून, तो ९ जून रोजी होणार आहे.

अंतिम सामना ९ ते १३ जून या कालावधीत 'द ओव्हल'वर खेळवला जाणार आहे. यापूर्वीचे सर्व अंतिम सामनेही इंग्लंडमध्येच झाले आहेत आणि यावेळीही तसेच होणार आहे. मात्र, 'द ओव्हल'वर अंतिम सामना होण्याची ही पहिलीच वेळ असेल.

सध्याच्या 'वर्ल्ड टेस्ट चॅम्पियनशिप' गुणतालिकेवर नजर टाकल्यास, ऑस्ट्रेलियन संघ अव्वल स्थानावर आहे. त्यांनी आतापर्यंत आठ सामने खेळले असून त्यापैकी सात जिंकले आहेत आणि एक गमावला आहे; त्यांची टक्केवारी ८७.५० इतकी आहे. दक्षिण आफ्रिका दुसऱ्या स्थानावर आहे; त्यांनी चार सामने खेळले असून तीन जिंकले आहेत आणि एक गमावला आहे, तसेच त्यांची टक्केवारी ७५.०० इतकी आहे. न्यूझीलंड तिसऱ्या स्थानावर आहे, तर बांगलादेश सध्या चौथ्या स्थानावर आहे. भारतीय संघ पाचव्या स्थानावर आहे.

भारतीय संघाने या 'वर्ल्ड टेस्ट चॅम्पियनशिप' (WTC) सायकलमध्ये आतापर्यंत नऊ सामने खेळले आहेत; त्यापैकी चार सामन्यांत विजय, चारमध्ये पराभव आणि एका सामन्यात अनिर्णित निकाल लागला आहे. परिणामी, संघाची गुण टक्केवारी सध्या ४८.१५ इतकी आहे. आता टीम इंडिया ऑगस्ट महिन्यात श्रीलंकेच्या दौऱ्यावर जाणार असून, तिथे 'वर्ल्ड टेस्ट चॅम्पियनशिप'चा भाग असलेली दोन सामन्यांची कसोटी मालिका खेळवली जाईल. या मालिकेत विजय मिळाल्यास गुणतालिकेतील संघाची स्थिती सुधारेल. श्रीलंका दौऱ्याचं वेळापत्रक यापूर्वीच जाहीर करण्यात आलं आहे.

## भारतासाठी आनंदाची बातमी! कॉमनवेल्थ गेम्समधील देशाचं पहिलं पदक निश्चित

**महाईन्यूज । स्कॉटलंड**

**स्कॉटलंडमधील ग्लासगो येथे राष्ट्रकुल क्रीडा स्पर्धा २०२६ आयोजित केल्या जात आहेत. यंदाच्या या स्पर्धेत १९ पैकी फक्त १० खेळांचा सहभाग असल्याने भारताच्या पदकांच्या संख्येत मोठी घट होणार आहे. पण २३ जुलै रोजी होणाऱ्या उद्घाटन समारंभापूर्वी भारतासाठी एक आनंदाची बातमी आली आहे. कॉमनवेल्थ गेम्समधील भारताचं पहिलं पदक निश्चित झालं आहे.**



यंदा राष्ट्रकुल क्रीडा स्पर्धेत क्रिकेट, हॉकी, बॅडमिंटन, रेसलिंग, स्क्वॉश, टेटे, डायव्हिंग, रग्बी, नेमबाजी या मोठ्या स्पर्धांचा समवेश नसणार आहे. त्यामुळे भारताच्या महत्त्वाच्या खेळांतील पदकं आता संघाच्या नावे नसतील. त्यामुळे आता सहभाग असलेल्या इतर खेळांमध्ये भारताच्या खेळाडूंना मोठी मेहनत घ्यावी लागणार आहे. याचदरम्यान आता स्पर्धेपूर्वीच भारताचं एक पदक नक्की झालं आहे.

महिलांच्या ७५ किलो वजनी गटातील बॉक्सिंग प्रकारात लव्हलिना बोरगोहेनचे पदक किमान कांस्य पदक निश्चित झालं आहे. याचं कारण म्हणजे, उपांत्यपूर्व फेरीत तिच्याशी लढणाऱ्या प्रतिस्पर्धीने स्पर्धेतून माघार घेतली आहे; त्यामुळे लव्हलिना थेट उपांत्य फेरीत पोहोचली आणि तिचं पदक पक्कं झालं. सेमीफायनल खेळणाऱ्या प्रत्येक खेळाडूला कॉमनवेल्थ स्पर्धेत कांस्यपदक दिलं जाणार आहे.

ऑलिम्पिक पदक विजेती भारतीय स्टार बॉक्सर लव्हलिना बोरगोहेन ही २०२६ च्या राष्ट्रकुल क्रीडा स्पर्धेच्या उपांत्य फेरीत तुवालूच्या ताफाकीचा सामना करणार आहे. महिलांच्या ७५ किलो वजनी गटातील हा उपांत्य सामना ३१ जुलै रोजी होणार असून, लव्हलिना अंतिम फेरीत धडक मारेल आणि त्याद्वारे किमान रौप्य पदक निश्चित करेल, अशी मोठी अपेक्षा आहे.

लोव्हलिना बोरगोहेनचे पदक निश्चित झाल्यानंतर, आता सर्वांच्या नजरा भारताचा स्टार भालाफेकपटू नीरज चोप्रा आणि वेटलिफ्टिंगमधील स्टार मीराबाई चानू यांच्यावर असतील; या दोघांकडूनही सुवर्णपदक जिंकण्याची अपेक्षा आहे. बर्मिंगहॅम येथे झालेल्या मागील राष्ट्रकुल क्रीडा स्पर्धेत भारताने २२ सुवर्णपदकांसह एकूण ६१ पदकं जिंकली होती.

यंदाच्या राष्ट्रकुल क्रीडा स्पर्धेत केवळ १० खेळांचे सामने आयोजित केले जात आहेत आणि परिणामी, पदकांसाठीच्या स्पर्धांची संख्याही कमी झाली आहे. पदकांची संख्या वाढवणं हे भारतीय पथकासमोरील एक मोठं आव्हान असेल. विविध क्रीडा प्रकारांत भाग घेण्यासाठी भारताचा १२५ खेळाडूंचा संघ २०२६ च्या राष्ट्रकुल क्रीडा स्पर्धेसाठी गेला आहे. २३ जुलै रोजी होणाऱ्या उद्घाटन समारंभापूर्वी, 'लॉन बॉल्स'मधील दोन सामन्यांनी भारतीय मोहिमेची सुरुवात होईल. भारतीय पथक ॲथलेटिक्स, बॉक्सिंग, वेटलिफ्टिंग, ज्युडो, आर्टिस्टिक जिम्नॅस्टिक्स, ट्रॅक सायकलिंग, बॉल्स आणि जलतरण या आठ क्रीडा प्रकारांमध्ये सहभागी होणार आहे.

D Y PATIL INTERNATIONAL UNIVERSITY
AKURDI PUNE

Think | Thrive | Transform

SCAN TO APPLY



## B.Sc.
# FORENSIC SCIENCES
## (Hons.)

**Be the Reason Behind the Truth.**

A multidisciplinary program that blends science, technology and investigation to analyze evidence, solve crimes and deliver justice.

### WHY CHOOSE THIS PROGRAM?

**EXPERIMENTAL LEARNING**
Hands-on training in modern laboratories, crime scene simulation and case studies.

**FUTURE-READY SKILLS**
Exposure to DNA Technologies and advanced analytics.

**FLEXIBLE CAREER PATHS**
Choose between industry internships, research projects or dissertation to become a specialist in your domain.

### WHAT YOU WILL LEARN

- Crime Scene Investigation
- Forensic Biology & DNA Analysis
- Forensic Chemistry & Toxicology
- Forensic Psychology
- Cyber Forensics
- Criminology & Criminal Law
- Digital & Computational Forensics

+91-8600091180 | admission@dypiu.ac.in | www.dypiu.ac.in

# महापालिका आरोग्य व वैद्यकीय समिती स्थापनेला अखेर मूर्त स्वरूप!

## शहर सुधारणा समिती सदस्य डॉ. सुहास कांबळे यांच्या पाठपुराव्याला यश

**महाईन्यूज । पिंपरी- चिंचवड**

**पिंपरी-चिंचवड शहरातील आरोग्य व वैद्यकीय सेवांचा दर्जा उंचावण्यासाठी स्वतंत्र आरोग्य व वैद्यकीय समिती स्थापन करण्याची मागणी सातत्याने लावून धरणारे शहर सुधारणा समिती सदस्य तथा नगरसेवक डॉ. सुहास कांबळे यांच्या पाठपुराव्याला अखेर यश मिळाले आहे. महापालिका सभेने विशेष समिती स्थापन करण्यास यापूर्वी मान्यता दिल्यानंतर आता या समितीचे कामकाजाचे क्षेत्र, अधिकार व कर्तव्ये निश्चित करण्याचा प्रस्ताव सर्वसाधारण सभेसमोर मंजुरीसाठी ठेवण्यात आला आहे.**




महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाच्या कलम ३० (१) अन्वये "आरोग्य व वैद्यकीय समिती" या विशेष समितीची स्थापना करण्यास महापालिका सभेने ५ मे २०२६ रोजी मान्यता दिली होती. त्यानुसार समितीच्या अधिकार व कार्यक्षेत्राबाबतचा प्रस्ताव विधी समितीनेही मंजूर केला असून, आता अंतिम मान्यतेसाठी तो सर्वसाधारण सभेपुढे ठेवण्यात आला आहे.

भाजपा आमदार महेश लांडगे यांच्या मार्गदर्शनाखाली नगरसेवक डॉ. सुहास कांबळे यांनी शहरातील वाढती लोकसंख्या, आरोग्य विषयक वाढत्या गरजा, महापालिकेच्या रुग्णालयांचे सक्षमीकरण, प्रतिबंधात्मक आरोग्य सेवा, जैववैद्यकीय कचरा व्यवस्थापन, राष्ट्रीय आरोग्य अभियानाची प्रभावी अंमलबजावणी आणि पशुसंवर्धन विभागाशी संबंधित आरोग्य विषयक बाबींचा स्वतंत्र व सखोल पद्धतीने विचार होण्यासाठी स्वतंत्र आरोग्य व वैद्यकीय समितीची आवश्यकता अधोरेखित केली होती. यासाठी त्यांनी सातत्याने पाठपुरावा केला होता.

प्रस्तावित समितीच्या कार्यक्षेत्रात आरोग्य वैद्यकीय अधिकारी विभाग, उपायुक्त (आरोग्य) विभाग, पशुसंवर्धन व मुख्य पशुवैद्यकीय अधिकारी विभाग, राष्ट्रीय आरोग्य अभियान, जैववैद्यकीय कचरा व्यवस्थापन, दवाखाना व रुग्णालय नोंदणी, वैद्यकीय गर्भपात कायदा, पीसीपीएनडीटी कायदा, सार्वजनिक आरोग्य विषयक नियम तसेच महानगरपालिकेच्या सर्व वैद्यकीय संस्था, रुग्णालये व दवाखान्यांशी संबंधित सर्व बाबींचा समावेश करण्यात आला आहे.

### ५० लाखांपर्यंत खर्च करण्याचा अधिकार...

याशिवाय समितीला दहा लाख रुपयांपेक्षा अधिक व पन्नास लाख रुपयांपर्यंतच्या खर्चाच्या प्रशासकीय मान्यता प्रस्तावांवर अंतिम निर्णय घेण्याचा अधिकार देण्यात येणार असून, पन्नास लाख रुपयांपेक्षा अधिक खर्चाच्या प्रस्तावांबाबत महापालिका सभेकडे शिफारस करण्याचे अधिकारही प्रदान करण्यात येणार आहेत. त्यामुळे आरोग्य विषयक विकासकामे व निर्णय प्रक्रियेला अधिक गती मिळण्याची अपेक्षा व्यक्त होत आहे. शहरातील आरोग्य सुविधांचा दर्जा अधिक सक्षम व लोकाभिमुख करण्याच्या दृष्टीने हा निर्णय महत्त्वपूर्ण मानला जात असून, डॉ. सुहास कांबळे यांनी केलेल्या सातत्यपूर्ण पाठपुराव्याचे हे फलित असल्याची चर्चा महापालिका वर्तुळात सुरू आहे.



"पिंपरी-चिंचवड हे झपाट्याने वाढणारे शहर असून, नागरिकांना अधिक दर्जेदार, सुलभ आणि परिणामकारक आरोग्य सेवा मिळणे ही काळाची गरज आहे. आरोग्य विषयक प्रश्नांची व्याप्ती मोठी असल्याने त्यासाठी स्वतंत्र आरोग्य व वैद्यकीय समिती असावी, ही माझी सातत्यपूर्ण भूमिका होती. या समितीच्या माध्यमातून महापालिकेची रुग्णालये, दवाखाने, प्रतिबंधात्मक आरोग्य सेवा, जैववैद्यकीय कचरा व्यवस्थापन तसेच राष्ट्रीय आरोग्य अभियानासारख्या महत्त्वाच्या विषयांवर अधिक प्रभावीपणे काम करता येणार आहे. आरोग्यविषयक विकासकामांच्या निर्णय प्रक्रियेला गती मिळून नागरिकांना त्याचा थेट लाभ होईल, असा मला विश्वास आहे. आरोग्यदायी पिंपरी-चिंचवड घडविण्याच्या दिशेने हे एक महत्त्वाचे पाऊल ठरणार आहे.

**– डॉ. सुहास कांबळे, शहर सुधारणा समिती सदस्य तथा नगरसेवक.**

# काळेवाडी कचरा संकलन केंद्राची सभापती अभिषेक बारणे यांच्याकडून पाहणी

**महाईन्यूज । पिंपरी- चिंचवड**

**"स्वच्छ शहर, सक्षम नियोजन आणि पर्यावरणपूरक भविष्य – हीच आपली दिशा!" या धोरणाला प्रत्यक्षात आणण्यासाठी पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेच्या वतीने जोरदार पावले उचलली जात आहेत. याचाच एक भाग म्हणून, स्थायी समिती सभापती अभिषेक बारणे यांनी आज काळेवाडी येथील एम.एम. कॉलेजजवळील कचरा संकलन केंद्राला थेट भेट दिली आणि तेथील संपूर्ण कामकाजाची पाहणी केली.**



या पाहणीदरम्यान सभापतींनी कचरा व्यवस्थापनाच्या प्रत्येक टप्प्याची सविस्तर माहिती घेतली. शहरातून गोळा होणारा ओला व सुका कचरा कशा पद्धतीने गोळा केला जातो, केंद्रावर त्याचे वर्गीकरण कसे होते आणि त्यावर वैज्ञानिक पद्धतीने प्रक्रिया करून विल्हेवाट कशी लावली जाते, याचा आढावा त्यांनी घेतला. तसेच, कचरा संकलन केंद्राचा परिसर आणि आजूबाजूच्या भागात उत्तम स्वच्छता राखली जावी, यासाठी त्यांनी संबंधित अधिकाऱ्यांना आवर्जून सूचना दिल्या.



शहराचा विस्तार वेगाने होत असून आगामी काळात लोकसंख्या आणखी वाढणार आहे, त्यामुळे निर्माण होणाऱ्या कचऱ्याचे प्रमाणही वाढणार आहे. ही भविष्यातील गरज लक्षात घेऊन आतापासूनच घनकचरा व्यवस्थापनाचे अधिक सक्षम आणि दूरगामी नियोजन करावे, असे स्पष्ट निर्देश सभापती अभिषेक बारणे यांनी यावेळी अधिकाऱ्यांना दिले. कचरा प्रक्रिया करणारी यंत्रणा अधिकाधिक गतिमान व प्रभावी ठेवण्यावर महापालिकेचा भर असल्याचे त्यांनी सांगितले.



"या दौऱ्यामुळे महापालिकेच्या घनकचरा व्यवस्थापन विभागाच्या कामकाजाला अधिक गती मिळणार असून, थेरगाव आणि काळेवाडी परिसरातील नागरिकांना स्वच्छ, सुंदर व आरोग्यदायी वातावरण मिळण्यास मोठी मदत होईल, असा विश्वास व्यक्त करण्यात येत आहे.

**- अभिषेक बारणे, सभापती, स्थायी समिती, पिंपरी चिंचवड महानगरपालिका.**

# नाल्यावरील अतिक्रमणावर महापालिकेचा बुलडोझर

## फ क्षेत्रीय कार्यालयाची कारवाई; पावसाळ्यापूर्वी नाला पूर्णपणे खुला




**महाईन्यूज । पिंपरी- चिंचवड**

**पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेच्या फ क्षेत्रीय कार्यालयाच्या वतीने ज्ञान प्रबोधिनी शाळा, मोरे वस्ती, गणेश नगर परिसरातील नाल्यावर करण्यात आलेल्या अनधिकृत बांधकामावर निष्कासनाची कारवाई करण्यात आली. या कारवाईदरम्यान नाल्यामध्ये टाकण्यात आलेले अनधिकृत पाइप काढून टाकण्यात आले असून संपूर्ण नाला खुला करण्यात आला आहे. त्यामुळे पावसाळ्यात पाण्याचा नैसर्गिक प्रवाह सुरळीत होण्यास मदत होणार आहे.**

ही कारवाई फ क्षेत्रीय कार्यालयाचे क्षेत्रीय अधिकारी तथा सहाय्यक आयुक्त अतुल पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आली. कारवाईदरम्यान उपअभियंता हेमंत घोड, कनिष्ठ अभियंता कुंभार, अतिक्रमण निरीक्षक गणेश तीकोणे, बीट निरीक्षक प्रफुल भोकरे, साईनाथ देसाई, ऐश्वर्या मासाळ तसेच संबंधित अधिकारी उपस्थित होते.

कारवाईसाठी अतिक्रमण विभागाचे ५ पोलीस कर्मचारी, महाराष्ट्र सुरक्षा बलाचे १७ जवान आणि महानगरपालिकेचे ५ मजूर सहभागी झाले होते. सदर कारवाईसाठी २ जेसीबी यंत्रांचा वापर करण्यात आला.

महानगरपालिकेकडून पावसाळ्यात पाण्याचा नैसर्गिक प्रवाह अबाधित ठेवण्यासाठी नाले, ओढे व जलवाहिन्यांवरील अनधिकृत अतिक्रमणांविरुद्ध अशाच प्रकारच्या कारवाया पुढेही सातत्याने सुरू राहणार असल्याचे प्रशासनाकडून सांगण्यात आले आहे.



“ पावसाळ्यात नाल्यांमधील पाण्याचा नैसर्गिक प्रवाह सुरळीत राहावा, यासाठी शहरातील सर्व क्षेत्रीय अधिकाऱ्यांना नालेसफाई आणि नाल्यांवरील अडथळे दूर करण्याच्या स्पष्ट सूचना देण्यात आल्या आहेत. त्याअंतर्गत ही कारवाई करण्यात आली असून अशी मोहीम इतर क्षेत्रीय कार्यालयांच्या हद्दीतही सातत्याने राबविण्यात येणार आहे. नागरिकांनी नाल्याच्या प्रवाहात अडथळा निर्माण होईल अशा प्रकारे अनधिकृतपणे पाइप किंवा इतर कोणतेही बांधकाम करू नये. नागरिकांच्या सहकार्यामुळे पावसाळ्यात पूरस्थिती टाळण्यास आणि शहरातील जलनिस्सारण व्यवस्था सक्षम ठेवण्यास मदत होईल.

**- डॉ. विजय सूर्यवंशी, आयुक्त, पिंपरी-चिंचवड महानगरपालिका**

# स्टेला सोसायटी, डुडूळगाव येथील पाणीपुरवठा होणार लवकरच सुरळीत!

**महाईन्यूज । पिंपरी- चिंचवड**

**भोसरी विधानसभा मतदारसंघातील डुडूळगाव येथील स्टेला सोसायटीमध्ये पाणीपुरवठा वाहिनीमध्ये चोकअप झाल्यामुळे पाणीपुरवठा विस्कळीत झाला होता. या समस्येची गंभीर दखल घेत आमदार महेश लांडगे यांनी महापालिकेच्या पाणीपुरवठा विभागाच्या अधिकाऱ्यांना तातडीने कार्यवाही करून नागरिकांना सुरळीत पाणीपुरवठा उपलब्ध करून देण्याच्या सूचना दिल्या होत्या. त्यानुसार प्रशासनाने युद्धपातळीवर काम हाती घेतले असून, पाणीपुरवठा वाहिनीतील अडथळा दूर करण्यात आला आहे.**





“ भोसरी विधानसभा मतदारसंघातील नागरिकांना मूलभूत नागरी सुविधा दर्जेदार आणि अखंडित स्वरूपात मिळणे, ही आमची प्राथमिकता आहे. स्टेला सोसायटी, डुडूळगाव येथील पाणीपुरवठ्याची समस्या निदर्शनास येताच महापालिकेच्या पाणीपुरवठा विभागाच्या अधिकाऱ्यांना तातडीने कार्यवाही करण्याच्या सूचना देण्यात आल्या. संबंधित अधिकाऱ्यांनी प्रत्यक्ष पाहणी करून वाहिनीतील चोकअप दूर केला असून, पाईपलाईन दुरुस्तीचे काम अंतिम टप्प्यात आहे. नागरिकांना कोणताही त्रास होऊ नये, यासाठी प्रशासनाने संवेदनशीलतेने आणि तत्परतेने काम करावे, अशा स्पष्ट सूचना देण्यात आल्या आहेत. दि. २३ जुलैपासून नियमित पाणीपुरवठा सुरू होणार असून, भविष्यात अशा समस्या उद्भवू नयेत यासाठीही आवश्यक उपाययोजना करण्यात येतील.

**- महेश लांडगे, आमदार, भाजपा, पिंपरी-चिंचवड, पुणे.**

सध्या पाईपलाईन दुरुस्तीचे काम अंतिम टप्प्यात असून, दि. २३ जुलैपासून पाणीपुरवठा नियमित व सुरळीत सुरू होणार आहे. या पार्श्वभूमीवर दि. २१ जुलै रोजी सायंकाळी स्टेला सोसायटीचे चेअरमन श्री. नितीन गावडे, मा. श्री. राजेश सस्ते, महापालिकेच्या पाणीपुरवठा विभागाचे श्री. जे. ई. आल्हाट तसेच संबंधित अधिकाऱ्यांनी घटनास्थळी भेट देऊन प्रत्यक्ष पाहणी केली. यावेळी चोकअपचे नेमके कारण शोधून तातडीने पाणीपुरवठा सुरळीत करण्याचे आश्वासन नागरिकांना देण्यात आले.

त्यानुसार दि. २२ जुलै रोजी सकाळपासून प्रत्यक्ष दुरुस्तीच्या कामास सुरुवात करण्यात आली. तांत्रिक तपासणीदरम्यान पाणीपुरवठा वाहिनीमध्ये दगड अडकल्यामुळे चोकअप झाल्याचे निदर्शनास आले. संबंधित दगड काढून वाहिनीतील अडथळा दूर करण्यात आला असून, सध्या पाईपलाईन दुरुस्तीचे काम प्रगतीपथावर आहे. सदर काम आज (दि. २२ जुलै) सायंकाळपर्यंत पूर्ण होण्याचे नियोजन करण्यात आले असून, दि. २३ जुलैपासून स्टेला सोसायटी परिसरातील पाणीपुरवठा नियमित व सुरळीत करण्यात येणार आहे.

भोसरी विधानसभा मतदारसंघातील नागरिकांना दर्जेदार व अखंडित नागरी सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी प्रशासनाकडून आवश्यक ती कार्यवाही प्राधान्याने करण्यात येत आहे. नागरिकांच्या दैनंदिन जीवनाशी निगडित असलेल्या पाणीपुरवठ्यासारख्या मूलभूत सुविधांबाबत कोणतीही दिरंगाई खपवून घेतली जाणार नाही, तसेच अशा समस्यांचे तातडीने निराकरण करण्यासाठी महापालिका प्रशासनाने सज्ज राहावे, अशा स्पष्ट सूचना आमदार महेश लांडगे यांनी संबंधित अधिकाऱ्यांना दिल्या आहेत.



# 'भारतीय शिक्षा बोर्ड'चे कार्यालय अन् आधुनिक गुरुकुल उभारणार

## विनायकराव भोंगाळे यांच्या पुढाकाराने महाराष्ट्रात कामाला गती

**महाईन्यूज । पिंपरी- चिंचवड**

**भारतीय संस्कृती, मूल्याधारित शिक्षण आणि आधुनिक तंत्रज्ञान यांचा सुवर्णमध्य साधत देशात नवी शिक्षणव्यवस्था उभी करण्यासाठी भारतीय शिक्षा बोर्ड (BSB), भारतीय शिक्षण अनुसंधान परिषद (BSAP) आणि पतंजली योगपीठ यांच्या संयुक्त विद्यमाने हरिद्वार येथे उच्चस्तरीय बैठकीचे आयोजन करण्यात आले होते. या बैठकीत पुण्यात भारतीय शिक्षा बोर्डाचे स्वतंत्र कार्यालय सुरू करण्यासह सैनिक शाळेच्या धर्तीवर आधुनिक निवासी गुरुकुल उभारण्याचा महत्त्वपूर्ण निर्णय घेण्यात आला आहे.**



या बैठकीत योगगुरू स्वामी रामदेव, आचार्य बालकृष्ण, भारतीय शिक्षा बोर्डाचे अध्यक्ष डॉ. एन. पी. सिंह (निवृत्त IAS) आणि भारतीय शिक्षण अनुसंधान परिषदेचे महासंचालक विंग कमांडर डॉ. पुष्कल विजय द्विवेदी (निवृत्त) यांनी उपस्थितांना मार्गदर्शन केले.

शिक्षणाची विद्यानगरी असलेल्या पुण्यात भारतीय शिक्षा बोर्डाचे कार्य व्यापक करण्यासाठी शिक्षण क्षेत्रातील कार्यकर्ते विनायकराव भोंगाळे यांनी पुढाकार घेतला आहे. त्यांच्या मार्गदर्शनाखाली पुण्यात आणि पालघर येथे गुरुकुल आधारित निवासी विद्यालये उभारण्याचा रोडमॅप तयार करण्यात आला आहे.

या प्रस्तावित गुरुकुल प्रणालीमध्ये विद्यार्थ्यांना खालील घटकांचे एकत्रित धडे दिले जातील:

भारतीय ज्ञानपरंपरा: वेद, उपनिषदे, संस्कृत, योग, आयुर्वेद व संस्कारमूल्ये.

आधुनिक शिक्षण: विज्ञान, गणित, तंत्रज्ञान, इंग्रजी भाषा आणि स्पर्धा परीक्षांचे विशेष प्रशिक्षण.

"भारताची शिक्षणव्यवस्था केवळ रोजगारापुरती मर्यादित न राहता, त्यातून राष्ट्रभक्ती, चारित्र्यनिर्मिती, नेतृत्वगुण आणि संशोधनाची वृत्ती जपली गेली पाहिजे. पुण्यात उभारले जाणारे आधुनिक गुरुकुल विद्यार्थ्यांना जागतिक स्तरावर स्पर्धा करण्यासाठी सक्षम करेल."

या बैठकीला गौरव पांडे, हेमदेव थापर, उद्योगपती व समाजसेवक पुरुषोत्तम शर्मा, डॉ. भाग्यश्री, प्रवीण टबके आणि योगेश भोंगाळे यांच्यासह विविध क्षेत्रांतील मान्यवर उपस्थित होते. महाराष्ट्राला भारतीय शिक्षणाच्या या राष्ट्रीय चळवळीशी जोडण्यासाठी विनायकराव भोंगाळे यांनी घेतलेल्या पुढाकाराचे सर्व स्तरांतून स्वागत होत आहे.

### मुंबई आणि पुण्यात कार्यालयांचा विस्तार

महाराष्ट्रात राष्ट्रीय शिक्षण धोरणास (NEP) सुसंगत अशा मूल्याधारित शिक्षणाचा प्रसार करण्यासाठी पुणे आणि मुंबई येथे बोर्डाची प्रादेशिक कार्यालये सुरू करण्यात येणार आहेत. यामुळे राज्यातील शैक्षणिक संस्था, उद्योग क्षेत्र आणि सामाजिक संघटनांना या चळवळीशी जोडणे अधिक सुलभ होणार आहे.

## विहिरीत मृतदेह टाकून मजुराचा खून; पश्चिम बंगालमधील तरुण अटकेत

**महाईन्यूज । पिंपरी- चिंचवड**




हिंजवडी पोलीस ठाण्याच्या हद्दीतील नेरे परिसरात बांधकामावर काम करणाऱ्या मजुराचा निर्घृण खून करून त्याचा मृतदेह विहिरीत फेकल्याची धक्कादायक घटना उघडकीस आली आहे. या प्रकरणी हिंजवडी पोलिसांनी अवघ्या काही तासांत संशयिताला अटक केली आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, मेमाणे वस्ती, सर्व्हे क्रमांक 61, नेरे (ता. मुळशी) येथील विहिरीत एका व्यक्तीचा मृतदेह आढळून आला. याबाबत रामदास पांडुरंग मेमाणे (वय 63, रा. नेरे) यांनी हिंजवडी पोलीस ठाण्यात फिर्याद दिली.

मृताची ओळख सुमन पात्रा (मूळ रा. सिमुलताला, जिल्हा नाडिया, पश्चिम बंगाल; सध्या नेरे येथील बांधकाम साईटवर वास्तव्यास) अशी झाली आहे.

प्राथमिक तपासात अज्ञात व्यक्तीने सुमन पात्रा यांच्या डोक्यावर व कपाळावर गंभीर वार करून त्यांचे हात, पाय आणि कंबरेला वायर बांधून विहिरीत फेकल्याचे निष्पन्न झाले. या हल्ल्यात त्यांचा मृत्यू झाला.

या प्रकरणी हिंजवडी पोलीस ठाण्यात गुन्हा क्रमांक 484/2026 अन्वये भारतीय न्याय संहिता (BNS) कलम 103(1) अंतर्गत खुनाचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

तपासादरम्यान पोलिसांनी संतू ऊर्फ विशाल बासुदेव मांजी (वय 22, मूळ रा. जिल्हा नाडिया, पश्चिम बंगाल) याला अटक केली असून, खुनामागील नेमके कारण व इतर बाबींचा पुढील तपास सुरू आहे.

या गुन्ह्याचा पुढील तपास हिंजवडी पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक पवार यांच्या मार्गदर्शनाखाली सुरू आहे.

## आर. के. एल. गॅलेक्सीच्या विद्यार्थ्यांचे 'एल्प्रो सिटी स्क्वेअर' गायन स्पर्धेत सुवर्णयश!

**महाईन्यूज । पिंपरी- चिंचवड**

**येथील 'एल्प्रो सिटी स्क्वेअर' येथे आयोजित करण्यात आलेल्या भव्य 'बिग सोलो अँड ग्रुप डान्स व सिंगिंग कॉम्पिटिशन'मध्ये आर. के. एल. गॅलेक्सी इंटरनॅशनल स्कूलच्या विद्यार्थ्यांनी प्रथम क्रमांक पटकावत शाळेच्या यशात मानाचा तुरा रोवला आहे.**




या स्पर्धेत विद्यार्थ्यांनी हनुमान चालीसा, प्रभू रामचंद्रजींचे दोहे आणि शिवस्तुती यांचे अप्रतिम फ्युजन (मिश्रण) करून एक सुरेल भक्तीमय गीत सादर केले. विद्यार्थ्यांच्या या मंत्रमुग्ध करणाऱ्या सादरीकरणाने उपस्थितांची मने जिंकली असून, परीक्षक व प्रेक्षकांनी उभे राहून (स्टँडिंग ओव्हेशन देऊन) त्यांच्या कलेला दाद दिली.

विद्यार्थ्यांच्या या उल्लेखनीय यशामागे शाळेचे संगीत शिक्षक आनंद काटे सर यांचे मोलाचे मार्गदर्शन आणि शिस्तबद्ध प्रशिक्षण लाभले. त्यांच्या मार्गदर्शनाखाली विद्यार्थ्यांनी घेतलेल्या अथक परिश्रमांच्या जोरावरच हे सुवर्णयश मिळवणे शक्य झाले.

आर. के. एल. गॅलेक्सी इंटरनॅशनल स्कूल नेहमीच विविध उपक्रमांच्या माध्यमातून विद्यार्थ्यांच्या सुप्त कलागुणांना वाव देण्यासाठी आणि त्यांच्या सर्वांगीण विकासासाठी कटिबद्ध असते, असे यावेळी स्पष्ट करण्यात आले.

विद्यार्थ्यांच्या या दैदीप्यमान यशाबद्दल शाळेचे चीफ एक्झिक्युटिव्ह ऑफिसर (CEO) डॉ. पुष्कर चौबे, चीफ ऑपरेटिंग ऑफिसर (COO) मिस मित्तल शहा, शाळा व्यवस्थापन, मुख्याध्यापक आणि सर्व शिक्षकवृंदांनी विजेत्या विद्यार्थ्यांचे मनःपूर्वक कौतुक केले असून त्यांच्या पुढील शैक्षणिक व कलात्मक वाटचालीस उज्वल शुभेच्छा दिल्या आहेत.